# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

## ।। प्र क ट न ।।

**विषय- फेब्रुवारी-मार्च २०२० मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करणेसाठी मुदतवाढ देणेबाबत....**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचेमार्फत मार्च २०२० मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेच्या फक्त नियमित विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे SARAL Database वरुन ऑनलाईन पध्दतीने दि. १५/१०/२०१९ ते ०५/११/२०१९ तसेच पुनर्परिक्षार्थी, यापूर्वी नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी, श्रेणी सुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय घेऊन परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे नियमित शुल्कासह ऑनलाईन पध्दतीने दि. ०६/११/२०१९ ते १५/११/२०१९ या कालावधीत व विलंब शुल्कासह दि. १६/११/२०१९ ते २५/११/२०१९ या कालावधीत भरावयाची होती. परंतु आवेदनपत्रे भरताना माध्यमिक शाळांना तांत्रिक व इतर अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले आहे. सबब सदर आवेदनपत्रे भरण्यास मुदतवाढ देण्यात येत असून सदर मुदतवाढीच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आल्या आहेत. सदर आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने **www.mahahsscboard.maharashtra.gov.in** किंवा **www.mahasscboard.in** या संकेतस्थळावर भरावयाची आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| शुल्क प्रकार | माध्यमिक शाळांमार्फत नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे SARAL Database वरुन आणि पुनर्परिक्षार्थी, यापूर्वी नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी, श्रेणी सुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय घेऊन परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे प्रचलित पध्दतीप्रमाणे ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या मुदतवाढीच्या तारखा | माध्यमिक शाळांनी चलन Download करुन बँकेत चलनाद्वारे शुल्क भरावयाच्या तारखा |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| अ) नियमित शुल्कासह → | मंगळवार दि. १५/१०/२०१९ ते बुधवार दि. २०/११/२०१९ | बुधवार दि. १६/१०/२०१९ ते सोमवार दि. ०२/१२/२०१९ |
| ब) विलंब शुल्कासह → | गुरुवार दि. २१/११/२०१९ ते शनिवार दि. ३०/११/२०१९ (सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) | |

अ) **माध्यमिक शाळांनी विभागीय मंडळाकडे शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या व Pre-list जमा करावयाची तारीख = बुधवार दि. ०४/१२/२०१९**

ब) **आवेदनपत्रे भरावयाच्या कालावधीमध्ये माध्यमिक शाळांनी Pre-list Print करुन विद्यार्थ्यांमार्फत आवेदनपत्रातील सर्व माहिती अचूक असल्याची खात्री करावी व विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घ्यावी. त्यानंतर सदर Pre-list चलनासोबत विभागीय मंडळात जमा करावी.**

आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे त्यांच्या माध्यमिक शाळांमार्फत भरावी. सर्व माध्यमिक शाळातील मुख्याध्यापक यांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील महत्वाच्या बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

१. **विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे SARAL Database वरुन Save होत नसल्यास त्यांनी उपरोक्त दिलेल्या मुदतीत All Application च्या link वरुन आवेदनपत्रे भरावयाची आहेत.**

२. सर्व विभागीय मंडळातील माध्यमिक शाळांनी प्रचलित शुल्क मंडळाने निश्चित केलेल्या बँकेच्या खात्यामध्ये जमा करुन चलनाची प्रत व विद्यार्थ्यांच्या याद्या दिलेल्या मुदतीतच संबंधित विभागीय मंडळाकडे सादर कराव्यात.

३. नियमित शुल्कासह तसेच विलंब शुल्कासह आवेदनपत्रे सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क दोन स्वतंत्र चलनाद्वारेच भरण्यात यावे.

दिनांक - ०२/११/२०१९

(डॉ.अशोक भोसले)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे - ०४